# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


जाहिर सूचना

क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१८/ 20८

दिनांक : 7 FEB 2018

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत........

संदर्भ :- या संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहिर सुचना क्रमांक २(३)/एनजीसी/ मान्यता/ २०१८/८, दि. ०२.०१.२०१८

विषयांकीत जाहिर सुचनेस अनुसरून कळविण्यात येते की, राज्यातील विद्यमान पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका (पीजीडीएम) या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना सादर केलेल्या खालील अर्जाची प्राथमिक तपासणी **संचालनालय स्तरावरुन करण्यात येणार आहे.**

- विद्यमान संस्थामध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे / सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ.(एआयसीटीईच्या मानकांनुसार तुकडी पुर्ण करणारे प्रस्ताव वगळून)
- विद्यमान संस्थेत अतिरीक्त इंडीग्रेटेड व ड्युअल डिग्री सुरू करणे, पदविका व पदवी संस्थेत NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करणे.
- विद्यमान संस्थेतील द्वितीय पाळीच्या अभ्यासक्रमाचे रुपांतरण प्रथम पाळीत करणे.
- विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे व याउलट करणे
- ओसीआय / पीआयओ/ परदेशी नागरीक/आखाती देशातीत भारतीय कर्मचा-यांची मुले यांच्यासाठी नव्याने अधिसंख्या जागा सुरु करणे (मान्यतेस विस्ताराचे (EoA) वगळून)
- अनिवासी भारतीयांच्या मुलांसाठी / मुलींसाठी नव्याने जागा ठेवण्यास सुरूवात करणे (मान्यतेस विस्ताराचे (EoA) वगळून)

२. **प्राथमिक तपासणीचे वेळापत्रक खालील प्रमाणे असून संबंधित संस्थानी त्यानुसार वरील प्रस्तावाची तपासणी करण्यासाठी या संचालनालयाच्या समितीसभागृहात उपस्थित राहवे.**

| अ.क्र. | विभाग | प्राथमिक तपासणीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय मुंबई व पुणे यांच्या कार्यक्षेत्रातील विद्यमान संस्था | दि. ०९.०२.०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता |
| २ | तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर यांच्या कार्यक्षेत्रातील विद्यमान संस्था | दि. १२.०२.२०१८ रोजी सकाळी १०.३० वाजता |

३. विद्यमान पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका (पीजीडीएम) या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी उपरोक्त नमूद केल्यानुसार प्राथमिक तपासणी आणि सुनावणीस येतांना संदर्भीन जाहिर सुचनेतील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद कागदपत्रांचे २ संच (स्पायलर बायडींग स्वरुपात व मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह), तसेच AICTE यांचेकडे सादर केलेल्या अर्जातील माहितीच्या पृष्ठर्थची दस्तावेज, सन २०१८-१९ च्या ॲप्रूव्हल प्रोसेस हॅंडबुक मध्ये नमूद केलेल्या मानके व प्रमाणकांच्या पृष्ठर्थ आवश्यक त्या मुळ कागदपत्रासह प्राथमिक तपासणीसाठी माहितीगार संस्थेच्या प्रतिनिधींनी (प्राचार्यांनी प्राधिकृत केल्याच्या प्राधिकारपत्रासह) उपस्थित राहवे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, १) सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२) सर्व विनाअनुदानित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची महाविद्यालये
३) सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई.